अल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटकसरीने, प्राधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय,क्रमांक:संकीर्ण-२०२६/(प्र.क्र. ५० /२०२६)/सिं.व्य.(धो.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५ ऑक्टोंबर, २०२६.

**संदर्भ** :- १. शासन निर्णय,क्रमांकः संकीर्ण-१०.००/ (१९/२०००)/सिव्य (धो), दि.०७.०३.२००१.
२. शासन निर्णय, क्रमांकः कासस-२०१५/( प्र.क्र १६२/२०१५)/सिव्य (म), दि.१८.०३.२०१६
३. शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५११/१८/सिंव्य (धो), दि.०१.१२.२०१८.
४. शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२०१७/(३१८/१७)/सिंव्य (धो), दि.१२.१२.२०१८.
५. शासन पत्र, क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/२६/सिंव्य (धो), दि.१७.०३.२०२६.
६. शासन पत्र, क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/२६/सिंव्य (धो), दि.१२.०५.२०२६
७. शासन पत्र, क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/२६/सिंव्य (धो), दि.१३.०६.२०२६
८. शासन पत्र, क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/२६/सिंव्य (धो), दि.२२.०७.२०२६
९. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि.२५.०९.२०२६

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील पर्जन्यमान हे प्रामुख्याने नैऋत्य मोसमी वाऱ्यांवर अवलंबून असून, हवामानातील बदलांमुळे पर्जन्यमानाची अनिश्चितता, कालावधी व वितरण यामध्ये सातत्याने बदल होत आहेत. अल निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पर्जन्यमानात घट झाल्याने मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भिय शासन निर्णय ९ अन्वये सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. अल निनोचा प्रभाव पुढील वर्षीपर्यत राहणार असल्याने राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने व अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्या अल निनोच्या अनुषंगाने जलसंपदा विभागामार्फत संदर्भिय पत्र ५ ते ८ अन्वये वेळोवेळी पाणी वापराबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

राज्यातील प्रमुख धरणे, जलाशये, तलाव व इतर जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला जलसाठा मर्यादित असल्याने त्याचा विविध उपयोगांसाठी काळजीपूर्वक व विशिष्ट प्राधान्यक्रमाने करणे आवश्यक आहे. संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अबाधित ठेवणे, जनावरांसाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था करणे, औद्योगिक क्षेत्रात पाण्याचा पुनर्वापर वाढविणे तसेच उपलब्ध पाण्याचा सिंचनासाठी आवश्यकतेनुसार काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे, आगामी वर्षात

संभाव्य कमी पर्जन्यमान व जलसाठ्यातील घट लक्षात घेऊन जलाशयांमध्ये आवश्यक बफर साठा राखणे, स्थानिक जलसाठ्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित साठा ठेवणे, नागरी पाणीपुरवठ्यातील गळती कमी करणे, पाण्याचा पुनर्वापर वाढविणे तसेच जलस्रोतांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा प्रभावीपणे रोखणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे धरणनिहाय व वापरनिहाय सूक्ष्म नियोजन करणे, विविध पाणी वापरांसाठी स्पष्ट प्राधान्यक्रम निश्चित करणे आणि संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी पूर्वतयारीच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याने, त्याबाबत पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत खालील प्रमाणे नियोजन करावे.

**१) पाणीवापराचा प्राधान्यक्रम**

**अ) पिण्यासाठीचा पाणीवापर**

i) पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पिण्याचे पाणी व घरगुती वापराकरीताचे पाणी निश्चित मापदंडानुसार विचारात घ्यावे. राज्यातील सर्व प्रमुख धरणे, जलाशये व संबंधित जलसाठ्यांचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च व प्रथम प्राधान्य देण्यात यावे. पिण्याच्या पाण्याची मापदंडानुसार उपलब्धता दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत सुरक्षित राहील, अशा पद्धतीने जलसाठ्याचे नियोजन करण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन करताना निकषानुसार लागणारे पिण्याचे पाणी व तसेच बाष्पीभवन, धरणात असलेला गाळ व अनधिकृत होणारा पाण्याचा उपसा इत्यादी बाबी देखील विचारात घेऊन पिण्यासाठी पुढील दि. ३१ ऑगस्ट, २०२७ पर्यंत पाण्याचे आरक्षण करावे.

ii) उपरोक्त i) मध्ये नमुद पाणीसाठ्याव्यतिरिक्त प्रत्येक प्रमुख जलाशयाच्या उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी किमान १० टक्के साठा अतिरिक्त बफर/आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात यावा. सदर बफर साठा हा अनपेक्षित पर्जन्यमानातील घट, दीर्घ कोरडा कालावधी वाढणे किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी राखीव राहील. बफर साठ्याचा वापर सर्वसाधारण पाणीवापरासाठी करण्यात येऊ नये. अत्यावश्यक परिस्थितीत, केवळ पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी त्याचा वापर करण्यात यावा.

iii) सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती ,ग्रामपंचायती व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पाणीगळती कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये **किमान १० टक्के कपात करावी.** तसेच उपलब्ध पाण्याचा दिनांक ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरवठा होणेच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार कपात वाढवावी. या संदर्भात आवश्यक ते आदेश वेळोवेळी संबधित जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित करावे

iv) पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करावी.

v) सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती ,ग्रामपंचायती व इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचेकडील सांडपाणी प्रकिया केंद्र पुर्ण क्षमतेने वापरावेत.सार्वजनिक उद्याने, बागा, दुभाजक व इतर हरित क्षेत्रांसाठी शक्य तेथे प्रक्रिया केलेले पाणी वापरण्यात यावे. प्रक्रिया करून उपलब्ध होणारे पाणी बांधकाम, औद्योगिक प्रक्रिया, धुलाई, हरित क्षेत्र, उद्याने व इतर पिण्याव्यतिरिक्त वापरांसाठी प्राधान्याने वापरण्यात यावे.

vi) ज्या जलाशयांमध्ये उपलब्ध जिवंत पाणीसाठा पूर्णपणे संपुष्टात आला आहे किंवा पिण्याच्या पाण्याची अत्यावश्यक गरज भागविण्यासाठी जिवंत साठा अपुरा आहे, अशा परिस्थितीत मृतसाठ्यातील पाण्याचा पिण्याच्या पाण्यासाठी वापर करण्याची शक्यता तपासण्यात यावी. मृतसाठ्याचा वापर करताना धरणाची संरचनात्मक सुरक्षितता, पंपिंगची तांत्रिक व्यवहार्यता, पाण्याची गुणवत्ता, उपलब्ध पंपिंग व्यवस्था व इतर तांत्रिक बाबींचा विचार करण्यात यावा.

vii) राज्यातील सर्व गाव तलाव, साठवण तलाव व स्थानिक जलसाठ्यांची पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवावेत उपलब्ध क्षमता व सद्यस्थितीचा आढावा जलसंधारण विभागामार्फत घेण्यात यावा.

**ब) औद्योगिक पाणीवापर**

i) औद्योगिक क्षेत्राने उपलब्ध पाण्याचा अत्यंत कार्यक्षम पद्धतीने व काटकसरीने वापर करावा. प्रत्येक संबंधित उद्योगाने त्याच्या एकूण पाणी वापरापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर/पुनर्चक्रण (Reuse/Recycle) करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित कराव्यात. ज्या उपयोगासाठी प्रकिया केलेले पाणी वापरणे शक्य आहे, त्या उपयोगासाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर कमी करण्याच्या दृष्टीने संबंधित उद्योगांनी उपाययोजना कराव्यात.

**क) सिंचनासाठीचा पाणीवापर**

i) पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाणी, औद्योगिक वापर आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ व इतर संस्थाच्या चा-यांच्या व बी-बियाणांच्या कार्यक्रमासाठी लागणारा पाणीसाठा याची गरज भागविल्यानंतर जर काही पाणी शिल्लक राहत असेल तर कमी पाणी लागणारी रब्बी हंगामी भूसार पिके व जास्त चारा देणारी भुसार पिके यांना प्राधान्याने मंजूरी द्यावी.

ii) वरीलप्रमाणे मंजूरी देऊनही पाणी शिल्लक राहत असल्यास रब्बी हंगामी पिकाचा विचार करावा.

iii) वरील सर्व गरजा भागविल्यानंतर पाणी शिल्लक राहत असेल तर प्रथम मंजूरी असलेल्या उभ्या बारमाही पिकांचा विचार करावा व नंतर नवीन बारमाही पीक लागवडीस परवानगी देता येईल काय हे पहावे.

२) वरीलप्रमाणे उपलब्ध जलसाठा, अपेक्षित आवक व पाण्याची मागणी विचारात घेऊन सिंचनाचे क्षेत्र, आवर्तन व पाणी सोडण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात यावे. कमी पाणी उपलब्ध असलेल्या परिस्थितीत पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींचा वापर वाढविण्यास प्रोत्साहन देण्यात यावे.

३) धरणे, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. संबंधित महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकांमार्फत नियमितपणे तपासणी व गस्त आयोजित करावी. अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर साधनसामग्री जप्त करून संबंधित व्यक्तींविरुद्ध शासन निर्णय, दि.१२.१२.२०१८ अन्वये संबंधितांवर कठोर कारवाई करावी.

४) सबंधित अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक प्रमुख धरण/जलाशयासाठी उपरोक्त नमूद बाबींचा विचार करुन धरणनिहाय पाणीवापर आराखडा तयार करावा. ज्या मोठया प्रकल्पांचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यांपेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये आहे त्या प्रकल्पांसाठी संदर्भिय शासन निर्णय २ नुसार मा.मंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या कालवा सल्लागार समितीने पाणी वापराचे नियोजन अंतिम करावे. अन्य मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांसाठी पाणीवापराचे नियोजन संबधीत जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील सनियंत्रण समितीने अंतिम करावे. दुष्काळ निवारणार्थ मा.मंत्रीमंडळ उपसमिती याचे दि.२८.०९.२०२६ च्या बैठकीतील सुचनेनुसार मा.पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे सनियंत्रण समिती नेमण्यात येत आहे .

| अ.क्र | पदनाम | समितील पद |
|---|---|---|
| १ | संबधीत जिल्ह्याचे मा.पालकमंत्री | अध्यक्ष |
| २ | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त | सदस्य |
| ५ | जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी | सदस्य |
| ६ | अधिक्षक अभियंता (धरणाशी संबधीत) | सदस्य सचिव |

५) संबंधित मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी जलाशयातील पाणीसाठा व विविध उपयोगांसाठी होणाऱ्या पाणी वापराचा नियमित आढावा घ्यावा. पर्जन्यमान, जलाशयातील आवक व उपलब्ध साठ्यामध्ये बदल झाल्यास आराखड्याचे पुनरावलोकन करून आवश्यक ते बदल कालवा सल्लागार/संनियंत्रण समितीच्या मान्यतेने बदल करण्यात यावेत.

६) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना जलसंपदा विभागास संबधित जिल्हाधिकारी, कृषी विभाग, उद्योग विभाग, नगरविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांशी आवश्यक सहकार्य करावे, व समन्वयाने दुष्काळी परिस्थितीवर मात करणेसाठी प्रयत्न करावेत.

**सदर शासन निर्णयातील जलसाठ्याच्या नियोजनाच्या तरतुदी दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत लागू राहतील.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००५१७२२२३१६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRAKASH BALKRUSHNA MISAL

Digitally signed by PRAKASH BALKRUSHNA MISAL
DN: c=IN, o=Personal, postalCode=411016, l=Pune, st=Maharashtra, street=OFF SENAPATI BAPAT ROAD, Pune, Maharashtra India 411016 C902 ROHAN TAPOVAN GOKHALE nagar, title=8218, 2.5.4.20=5d509217122f062dc0783fba85924445be38046f3473abdf40ef790485b9591e, serialNumber=244a1f8434f34514178081abc430161cc61a193ba94418088d8fc82f326dc0c3, email=prakashmisal001@gmail.com, cn=PRAKASH BALKRUSHNA MISAL
Date: 2026.10.05 17:23:56 +05'30'

**( प्रकाश मिसाळ )**
**शासनाचे सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, नगरविकास, गृहनिर्माण व सा.बां.(सा.उ.) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, रा.उ.शुल्क, क्रीडा व युवक कल्याण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री, जलसंपदा (कृष्णा, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग,१, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग,२, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वछ्ता विभाग,मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, उद्द्योग विभाग,मंत्रालय, मुंबई
१४) सचिव, कृषी विभाग,मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, मृद व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
१६) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर/ पुणे/ नागपूर/ ठाणे/जळगाव.
१९) सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर/ पुणे/ नागपूर/ ठाणे/ जळगाव.
२०) सर्व अधीक्षक अभियंता , पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर/ पुणे/ नागपूर/ ठाणे/ जळगाव.
२१) सर्व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर/ पुणे/ नागपूर/ ठाणे/ जळगाव.
२२) सिंव्य(धोरण) संग्रहार्थ